# धरणे





## डोलवाला धरण

(तालुका कोलाड) कोलाडच्या सह्याद्री रांगांमध्ये घनदाट जंगलात हे धरण आहे. धरणाच्या आजूबाजूचा परिसर अतिशय निसर्गरम्य आहे. धरणाच्या पाण्याचा वापर शेतीसिंचनासाठी केला जातो. त्यासोबतच येथे जलविद्युतनिर्मिती केंद्र देखील आहे.



# शहापाडा धरण

पेण तालुक्यातील शहापाडा धरण रोडे ग्रामपंचायतीच्या हद्दीत पिण्याच्या पाण्यासाठी बांधण्यात आले आहे. हे धरण मुंबई-गोवा हायवेवरील वाशी नाक्यासमोरील रोडे फाट्यापासून ११ कि.मी. अंतरावर आहे. संपूर्ण दगडी बंधाऱ्याचे हे धरण असून त्याची उंची ४० फूट व लांबी ७२० फूट आहे. हे धरण रायगड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत आहे.

# हेटवणे धरण

पेण तालुक्यातील हेटवणे हे धरण मध्यम सिंचन प्रकल्पांपैकी एक असून महाराष्ट्र पाटबंधारे तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत अंतर्भूत करण्यात आले आहे. पेण खोपोली मार्गावर पेणपासून ९ कि.मी. अंतरावरील वाकरूळ गावानजीक हा महत्त्वाचा सिंचन प्रकल्प आहे. भोगेश्वरी नदीचे पाणी अडवून या प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. हे धरण ४८.२ मी. उंचीचे असून त्याची लांबी ७६५ मी. आहे.



# मोर्बे धरण

खालापूर तालुक्यातील मोर्बे हे धरण पनवेल–कर्जत मार्गावर असून ते पाताळगंगेची उपनदी असलेल्या धावरी नदीवर बांधण्यात आले आहे. पूर्णपणे मातीच्या असलेल्या या धरणाची क्षमता १६५.३७ दशलक्ष घनमीटर इतकी आहे.



# गारंबी धरण व धबधबा

सिद्दी वंशाचा शेवटचा नवाब सिद्दी अहमद खान याने हे धरण राणी व्हिक्टोरियाच्या स्मरणार्थ बांधले होते. त्यामुळे हे धरण व्हिक्टोरिया ज्युबिली वॉटर वर्क्स या नावाने देखील ओळखले जाते. धरणाची रचना व आसपासचा परिसर अतिशय रमणीय आहे. संध्याकाळी विविध प्रकारचे पक्षी येथे मोठ्या संख्येने जमतात व त्यांचे सुमधुर ध्वनी आसपासच्या परिसरात घुमत राहतात. त्यामुळे हे ठिकाण निसर्गप्रेमींसाठी संस्मरणीय ठरते. सुमारे १०० मीटर उंचीवरून कोसळणारे स्फटिकासारखे शुभ्र पाणी डोळ्यांचे पारणे फेडते. पावसाळ्यात या परिसरातील धबधब्याला अवश्य भेट द्यायला हवी.

